# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर

(प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in


25 वर्षे विकासाची 25 "माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र.मनपा/सा.प्र./४०८/२०२६-२७ दि.०५/१०/२०२६

## // परिपत्रक //

**विषय : - "अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताह" निमित्त मंगळवार दि. ०६ ऑक्टोंबर २०२६ रोजी ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्याबाबत.**

**संदर्भ :- १) मा.सचिव मराठी भाषा विभाग यांचेकडील म.शा.पत्र क्र.अभिजा २०२६/ प्र.क्र.११७/भाषा-१, दि.१०/०९/२०२६ रोजीचे पत्र**

**२) क्र./सामान्य/कक्ष-६/मराठी भाषा/सेतु/कावि-०३/२०२६, दि.२१/ ०९/२०२६ रोजीचे पत्र.**

कळविण्यांत येते की, "**अभिजात मराठी भाषा सन्मान दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताह**" साजरा करणेबाबत संदर्भिय पत्रान्वये निर्देशित केलेले आहे. त्यानिमित्त **मंगळवार दि. ०६ ऑक्टोंबर २०२६** रोजी मि.भा.मनपा मुख्य कार्यालयातुन सकाळी ११.०० वा. **"मराठी भाषा ग्रंथ दिंडी"** आयोजन तद्नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरभवन हॉल येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

सदर कार्यक्रम **मा. महापौर श्रीम. डिंपल विनोद मेहता** यांचे शुभहस्ते मा. उपमहापौर श्री. ध्रुवकिशोर पाटील व मा. आयुक्त श्री. राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मा. स्थायी समिती सभापती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, मा. महिला व बालकल्याण समिती सभापती व उपसभापती, मा. सभापती प्रभाग समिती क्र. १ ते ६, मा. सभापती पाणी पुरवठा व मलनि:सारण समिती, मा. सभापती शिक्षण, क्रिडा व सांस्कृतिक समिती, मा. सभापती आरोग्य व वैदयकीय आरोग्य, पर्यावरण, उदयान व शहर सुशोभिकरण समिती, मा. सभापती समाज कल्याण व झोपडपट्टी सुधार समिती, मा. सभापती परिवहन, मा. अध्यक्षा रौप्य महोत्सवी वर्ष समिती, मा. नगरसेवक / नगरसेविका (सर्व), मा. पदाधिकारी (सर्व), मा. पत्रकार वर्ग तसेच सर्व प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी सदर कार्यक्रमास सर्वांनी वेळेत उपस्थित रहावे. ही विनंती.

**(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)**

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**